आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार दिनांक १९ जुलै २०२५

ठळक बातम्या

- संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून/ केंद्र सरकारनं बोलावली उद्या सर्वपक्षीय बैठक.
- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करायचं काम वेगाने सुरू - माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन.
- 'मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी **2.0'**योजनेत प्रकल्पनिहाय समन्वय अधिकारी देणार-अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांची नागपुरात माहिती.
- विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात येत्या २३ जुलै पर्यंत वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट, काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता.

पावसाळी अधिवेशन

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारी २१ जुलैपासून सुरू होत आहे. ते येत्या २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं उद्या दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अधिवेशनात दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत व्हावं याकरता सरकार या बैठकीत सर्व पक्षांना सहकार्याचं आवाहन करेल. या पावसाळी अधिवेशनात अनेक महत्त्वपूर्ण विधेयकांवर चर्चा होईल.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करायचं काम वेगाने सुरू आहे, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केलं. हैदराबादच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या पदवीदान सोहळ्यात ते बोलत होते. देशाच्या तंत्रज्ञानाधारित भविष्याकडे लक्ष वेधून त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचं तंत्रज्ञान आणि उत्पादनं तयार करण्याचं आवाहन केलं. सेमीकंडक्टर क्षेत्रात सुरू असलेल्या कामाबद्दल ते म्हणाले,

***First manufactured chip in India on a commercial scale will be manufactured in this year 2025. The way we have created the Talent pool, The way we are promoting the designs and the way we are going deeper into the capital equipment and the material required for semiconductors. India will become one of the top five semiconductor Nations in the world in the coming years.***

चीन पहलगाम

चीनने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून प्रादेशिक सुरक्षा मजबूत करण्याच्या हेतूनं सर्व देशांनी दहशतवाद विरोधातली एकजूट बळकट करण्याचं आवाहन केलं आहे. लष्कर-ए-तैय्यबा या दहशतवादी संघटनेचा गट रेझिस्टन्स फ्रंट पहलगाम हल्ल्यामागे होता, या गटाला अमेरिकेनं दहशतवादी संघटना घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर चीननं ही प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तान मधले लष्कर-ए-तय्य्यबा, जैश-ए-मोहम्मद, जमात उद दावा हे दहशतवादी गट आणि हाफीज सईद, मसूद अझर या दहशतवादी कारवाया करणाऱ्या व्यक्तींचा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं निर्बंध नियमांतर्गत समावेश केला आहे.

स्वच्छ भारत

नागपूरच्या मध्य रेल्वेमध्ये चिकित्सक पदावर कार्यरत असलेले डॉक्टर निर्भय यांनी स्वयंस्फूर्तीने स्वच्छतेचा वसा घेतला असून, दर रविवारी 100 मीटर पर्यंतचा रस्ता स्वच्छ करण्याचा अनुकरणीय उपक्रम सुरू केला आहे, त्याबद्दल ऐकूया त्यांच्याकडून-

*रविवार और शनिवार को मैं सिविल लाइन्स में ईस्ट हाय कोर्ट पर भोले पेट्रोल पंप से तिरपुडे कॉलेज टी प्वाइंट तक कचरा उठाता हूँ। रोड के दोनों ओर, और डिवाइडर पर पड़े हुए प्लास्टिक के बॉटल, रैपर, पन्नी, कांच के बॉटल, सिगरेट के पैकेट इत्यादि इकट्ठा करता हूँ और डस्टबिन में डालता हूँ।अगर हर लोग सिर्फ संडे के दिन अपने घर के पास का 100 मीटर भी साफ करें तो देश का लाखों किलोमीटर साफ हो सकता है तो हम लोग प्रण करें, हर कोई संडे के दिन 100 मीटर, देश होगा सुंदर और महान।*

स्वच्छ सर्वेक्षण

स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ अंतर्गत ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये चंद्रपूर शहराने देशात २१वा क्रमांक प्राप्त केला आहे. यासोबतच चंद्रपूर शहराला स्वच्छतेसाठी थ्री स्टार सिटी म्हणून गौरविण्यात आले आहे. स्वच्छतेविषयक अहवालानुसार, चंद्रपूर महानगरपालिकेने डोअर टू डोअर  कचरा संकलन ९३% प्रमाणात यशस्वीरीत्या राबवले जात आहे. तसेच ७६% नागरिक ओला व सुका कचरा वेगवेगळा करतात, हे ही एक महत्त्वाचे पाऊल आहे. विशेष म्हणजे संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते आणि शहराने ओपन डिफेकेशन फ्री (**ODF++**) दर्जा कायम राखलेला आहे. आगामी काळात सीवरेज प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चंद्रपूर देशातील टॉप १० शहरांमध्ये स्थान मिळवेल, असा विश्वास आयुक्त विपीन पालीवाल यांनी व्यक्त केला आहे.

"मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना **2.0**"

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0" ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच प्रकल्प विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी प्रकल्पनिहाय आणि जिल्हानिहाय समन्वय अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत. अशी माहिती अपर मुख्य सचिव  आभा शुक्ला यांनी आज नागपुरात दिली,  नागपूर जिल्ह्यासाठी 278 मेगावॅटचे उद्दिष्ट आहे, ज्यासाठी 15 विकासकांना काम देण्यात आले असून, 59 वीज उपकेंद्रांतील कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करायचे आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नागपूर जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सच्या बैठकीत श्रीमती आभा शुक्ला बोलत होत्या. आभा शुक्ला यांनी योजनेच्या जलद आणि यशस्वी अंमलबजावणीसाठी अनेक महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा केली. यामध्ये सौर प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी, तांत्रिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि वन विभागाशी संबंधित अडचणी दूर करणे यावर भर देण्यात आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनीची उपलब्धता सुलभ करण्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. खाजगी शेती जमीन मालकांना या योजनेत लाभ घेण्यासाठी मिळणाऱ्या लाभाबाबत व्यापक जनजागृती करण्याबाबत आदेशित करण्यात आले.

हवामान

येत्या **23** तारखेपर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रांना दिला आहे. **21** तारखेला

गोंदिया आणि गडचिरोली तर **22** आणि **23** तारखेला नागपूर भंडारा गोंदिया, चंद्रपूर गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

पुरेसा पाऊस

अर्धा जुलै महिना उलटून गेला असतानाही वाशिम जिल्ह्यात पुरेसा पाऊस न झाल्यामुळे अनेक जलप्रकल्प अद्याप भरलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण आहे. मागील वर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यात वाशिम-कारंजा महामार्गावरील गायवळ लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला होता. मात्र, यावर्षी या प्रकल्पात केवळ २० टक्केच जलसाठा नोंदवला गेला आहे. या तुलनेत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने पाणीसाठ्यावर थेट परिणाम झाला आहे. अशा स्थितीत खरीप हंगामाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर मोठं आव्हान उभं ठाकलं आहे. पिकांना आवश्यक तेवढा पाण्याचा पुरवठा न झाल्यास उत्पादनात घट येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

वृक्षारोपण

पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने पाऊल टाकत नागपूर महानगरपालिकेद्बारे एलएडी कॉलेज आणि नागपूर फर्स्ट फाउंडेशन यांच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यात आले. यादरम्यान एकूण ५० रोपे लावण्यात आली. एलएडी कॉलेजच्या विज्ञान आणि मानव्यविद्या शाखेच्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपणात भाग घेतला.

जागतिक बुद्धीबळ

भारतीय ग्रँडमास्टर्स कोनेरू हम्पी, डी. हरिका, आर. वैशाली आणि आंतरराष्ट्रीय मास्टर नागपूरची दिव्या देशमुख यांनी फिडे जागतिक बुद्धीबळ महिला कप स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. या स्पर्धेत अंतिम आठ टप्प्यात चार खेळाडू असलेला भारत हा पहिलाच देश बनला आहे.

शार्क ॲक्वेटिक

शार्क ॲक्वेटिक स्पोर्टिंग असोसिएशन, क्रीडा भारती आणि टायगर ग्रुप ऑफ एडवेंचर यांच्या संयुक्त विद्यमाने जलतरण शिबिराच्या प्रमाणपत्र वितरणाचा समारोह व महिला सायकलपटूंच्या सत्काराचा कार्यक्रम नुकताच सेवा-सदन शिक्षण संस्थेत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा भारतीचे, अखिल भारतीय नियामक

मंडळाचे सदस्य प्रसन्न हरदास यांनी "खेळात गुरूंचे महत्व पटवून दिले. प्रमुख उपस्थितीमध्ये आयर्न मॅन राजेंद्र जयस्वाल यांनी" भारतमाते विषयी खेळाडूंचे समर्पण" याविषयी मार्गदर्शन केले.

एपीटी प्रणाली

टपाल विभागानं पुढील पिढीच्या एपीटी प्रणालीची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली आहे. एपीटी प्रणालीची रचना सुयोग्य अनुभव, वेगवान सेवा वितरण आणि वापरकर्त्यांसाठी अनुकूल करण्यात आली आहे. ही सुधारित प्रणाली दिल्लीच्या टपाल कार्यालयांमध्ये येत्या सोमवारपासून अंमलात येणार आहे. ही प्रणाली कार्यरत करण्यासाठी दिल्लीमधल्या काही प्रमुख टपाल कार्यालयांमधलं कामकाज सोमवारी जनतेसाठी बंद राहणार असल्याची माहिती दूरसंचार मंत्रालयानं दिली आहे.

*****